
ISSN:- 2230-7850 VOLUME-5 | ISSUE-2 | MARCH -2015

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# साहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास




*लता प्रकाश महाजन*

प्रमुख, मराठी विभाग , शारदाबाई पवार महिला महाविद्यालय ,
शारदानगर, माळेगांव बु।।,
ता. बारामती जि. पुणे.

*सारांश :–*

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात जग एक झाले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या जाळयामुळे संप्रेषण, आदान–प्रदान वाढलेले आहे. सांस्कृतिक, भाषिक, साहित्यिक बदल होत आहेत व भाषाही बदलत आहे. मराठी भाषा तर अनेक आक्रमण झेलत पुढे चालत राहिली आहे. साहित्यात आत्माविष्कार असून मानवी भावविश्वाशी त्याचा संबंध असतो. मानवाचे संस्कृती रुप म्हणजे साहित्य निर्मिती असते. मानवीय बुध्दीचा आणि संवेदनशीलतेचा नितांत रमणीय विलास म्हणजे साहित्य होय.

### 1) प्रस्तावना :–

साहित्य नेहमीच माणसाला साहय्य करीत आलेलं आहे. तेच त्याच्यासाठी आशेचं, साहयाचं आणि शौर्याचं प्रेरणास्त्रोत बनून राहिलेलं आहे. आपला भारत देश अनेक साहित्य संपन्न अशा भाषांचा देश आहे आणि म्हणून आपल्या या साहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास होणे अत्यंत गरजेचे आहे.

''चार्ल्स नोडियाने म्हटले आहे की एखादया समाजाचे चित्र त्याच्या साहित्यात उमटते. रॉबर्ट लॉर्ड लिटनच्या मते एखादया राष्ट्राचे साहित्य म्हणजे नेहमीच त्यातील माणसांचा इतिहास असतो.''

सध्याचे युग हे साहित्याचा सर्वांगीण अभ्यास करण्याचे आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. कारण माणसाला बहुआयामी, बहुभाषिक जर बनायचे असेल तर त्याचा इतर शाखांचा एकमेकांशी कसा संबंध आहे याबरोबरच उपयोग कसा होईल हे पहावे लागेल.

### 2) विज्ञान साहित्य –

विज्ञानावरील लिखाण बहुरंगी असते. डॉ. जयंत नारळीकर यांनी त्याचे वर्गीकरण करतानाच त्याची उपयुक्तता स्पष्ट केलेली आहे. 1) संशोधनाचे प्रबंध 2) रिव्हू आर्टिकल (म्हणजेच विज्ञानाच्या एखादया शाखा – उपशाखेतील जागतिक प्रगतीचा आढावा) 3) नियतकालिका 4) विज्ञानकोश 5) वैज्ञानिक माहिती पुरविणारे मासिक उदा. गो. रा. परांजपे यांनी सुरू केलेली लेख परंपरा 6) कथा – कादंबरी कविता यांच्या माध्यमातून वैज्ञानिक कल्पना मांडणे.

यांच्या माध्यमातून लोकजागृती होते आणि विज्ञान लोकांपर्यंत पोहचते. त्याच साहित्यकृतीचा वेगवेगळया अंगाने अभ्यास करता येतो. विज्ञानातील एखादी कल्पना गोष्टीरूपाने मांडता आली तर वाचक ती सहजगत्या आत्मसात करू शकतो. डॉ. जयंत नारळीकर यांचा यक्षांची देणगी हा कथासंग्रह असाच आहे. विज्ञानातील काही सिध्दांत गोष्टीरूपाने कथेव्दारे मांडल्यामुळे सामान्यापर्यंत विज्ञान पोहचले.

फ्रेड हॉएल या सुप्रसिध्द खगोल वैज्ञानिकाचे विज्ञानकथा लिहिण्यामागे एक वेगळेच कारण घडले. 1950–1960 च्या दशकात आरंभिक भागात डॉ. फ्रेड हॉएल यांना एक कल्पना सुचली. अंतराळात ता–या दरम्यान असलेला विशाल प्रदेश हायड्रोजन अणूने व्याप्त आहे असा एक सर्वमान्य समज होता. हायड्रोजन अणूतील संक्रमणामुळे त्यातून 21 से.मी. लांबीच्या लहरी निघतात व अशा लहरी रेडिओ दुर्बिणीतून प्रत्यक्ष सापडल्या होत्या त्यापलीकडे जाऊन हॉएल यांनी असा तर्क उपस्थित केला की या प्रदेशात विविध रेणूंनी व्याप्त मेघ पण आहेत. त्यामागची वैज्ञानिक बैठक मांडणारा संशोधन प्रबंध त्यांनी लिहिला पण तो प्रसिध्द करायला त्या विषयातली नियतकालिके तयार नव्हती. कारण बहुतेक शास्त्रज्ञांना ही कल्पना अवास्तव वाटत होती. तेव्हा त्यांनी ही कल्पना एका विज्ञान कथेत घातली. व ती ''द ब्लॅक क्लाऊड'' The Black Cloud (कृष्णमेघ) या कांदबरीच्या रूपाने प्रसिध्द केली. ती कादंबरी कमालीची लोकप्रिय झाली. पुढे 1960 नंतर मिलीमीटर वेव्हलेंग्थच्या लहरीचंचे टेलीस्कोप प्रचारात आले आणि खगोलशास्त्रज्ञांना अंतराळात रेणूचे मेघ सापडू लागले – कारण अशा रेणूतून मिलीमीटरच्या आसपास लांबीच्या लहरी निघतात.

एय. जी. वेल्स, ऑर्थर सी क्लार्क, मे ब्रॅडवरी, आयझॅक ॲसिमाव्ह यांनी विज्ञान साहित्यात भर घातली तर सायबर कॅफे, बाळ फोंडके, आभाळ फाटलंय लक्ष्मण लोंढे, वारस – निरंजन घाटे, प्रेषित, यक्षांची देणगी डॉ. जयंत नारळीकर, अरण्य रूदन – संतोष शिंदे, अविसूक्ष्म – महाप्रचंड शैलेश माळवदे यांचे साहित्य आहे.

### 3) विज्ञान साहित्य आणि मराठी भाषा –

विज्ञान साहित्यातील मराठी भाषा साधी, सरळ असते. आजकाल मराठीवर इंग्रजीचे आक्रमण होत आहे पण हे अतिक्रमण न मानता मराठी भाषेत आजच्या विज्ञान युगात जे वैज्ञानिक शब्द रूढ झाले आहेत ते परकीय भाषेतील असले तरी जसेच्या तसे घ्यावेत. उदाहरण म्हणून टी. व्ही., रेडिओ, मायक्रोवेव्ह, रॉकेट, इ. शब्द मराठी भाषेत वापरले तर इंग्रजीचे आक्रमण होणार नाही. खुद्द इंग्रजीनेही इतर भाषांतले शब्द आत्मसात करून, पचवून आपली क्षमता वाढवली आहे. विज्ञानातील नवनवे शोध आणि तंत्रज्ञानातील आधुनिक निर्मिती हे जगभर इंग्रजीतून प्रसिध्द होतात. त्यामुळे नवी शब्दनिर्मिती आणि तिला लाभणारी जनमान्यता इंग्रजीतून बहुतांशी होते तेव्हा अशा विज्ञानाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या साहित्यात पारिभाषिक इंग्रजी शब्द आले तर बिघडत नाही असे डॉ. जयंत नारळीकर यांनी म्हटले आहे.

### 4) आस्वादक विज्ञान –

साहित्य हे लालितत्यपूर्ण असते. ते वाचावेसे वाटते आणि नंतर मनामध्ये रूजते. समाजातील अंधश्रध्दावर उपाय म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन समाजमनात रूजविणे म्हणजे नीट तपासणी करूनच एखादया गोष्टीचा स्वीकार करणे. हा दृष्टीकोन वैज्ञानिक संशोधनाच्या मुळाशी असला तरी तो जीवनात इतरत्रही लागू पडतो म्हणूनच जनसामान्यापर्यंत हे विज्ञान साहित्याच्या माध्यमातून पोचायला हवे हळूहळू पोचते आहे. डॉ. नारळीकर म्हणतात – ''विज्ञानाची गोळी जर का कडू लागत असेल तर त्याला ''साखरेचे कोटींग'' करून ते वाचकांपर्यंत पोहचवले पाहिजे.

लहानपणापासूनच अशी विज्ञानाच्या साहित्याची गोडी लावता येते. ''हवेचा दाब जास्त दाबाकडून कमी दाबाकडे जातो'' या

संदर्भातली बालकथा सांगता येईल.

एका कोल्हा आणि करकोचा यांची घनिष्ठ मैत्री होती. एकदा कोल्हयाने करकोच्याला जेवायला बोलावलं आणि बशीत खीर दिली. त्याच्या निमुळत्या बारीक चोचीमुळे त्याला खीर खाता आली नाही. तो उपाशी राहिला कोल्हयाने मात्र त्याचीही खीर खाऊन टाकली. नंतर करकोच्याने कोल्हयाला जेवायला बोलावलं आणि एका उंच मानेच्या सुरईत बासुंदी भरून कोल्हयासमोर ठेवली. करकोचा बासुंदी पीत होता आणि कोल्हा मात्र काहीच करू शकत नव्हता. त्याला कळलं की हा आपल्या मागच्या वेळेच्या वागण्याच्या संदर्भातून बदला घेतोय. तो काहीच बोलेना मग करकोच्याने काय केले की त्याला एक नळी दिली तो बासुंदीत टाकून पी म्हणून सांगितले. कोल्हयाने तसे केले आणि काय आश्चर्य! कोल्हयाला बासुंदीचा आस्वाद घेता आला. कोल्हयाने करकोच्याची क्षमा मागितली आणि त्याला विचारलं की हे कसं शक्य झालं? तेव्हा करकोचा म्हणाला, ''नळीतून द्रवपदार्थ पिताना आपल्याला आपण द्रवपदार्थ वर खेचतोय असं वाटतं, पण खरं तसं नसतं. प्रत्यक्षात आपण नळीतील द्रवपदार्थावरील हवा तिथून काढून घेत असतो. त्यामुळे तेथील हवेचा दाब कमी होतो. नळीतील द्रव्यांच्या स्तंभाकडील दाब ढळतो. त्या स्तंभाच्या तळाशी जास्त दाब आणि स्तंभावर कमी दाब अशी स्थिती होते. जास्त दाब कमी दाबाकडे जाऊ लागतो त्यामुळे द्रवपदार्थ वर चढतो आणि तोंडात येतो''.

असं होतं तर! कोल्हा म्हणाला. शेवटी दोघांनी खरी मैत्री करण्याचे एकमेकांना वचन दिले अन् ते सुखात राहू लागले. अशा पध्दतीने विज्ञानालाही आस्वादक बनविता येते.

मराठी विज्ञान परिषदेतर्फेही वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. समाजातील ज्या काही रूढी, परंपरा आहेत त्यातील विज्ञानही उलगडता येते. उदा. तुळस दारात का असावी? तुळशीमधले गुणधर्म कोणते? (ओझोन वायू) इ. तसेच दृष्टमाळ असते म्हणजे मिरची आणि लिंबू एकत्रित ओवून दुकानात लावले जातात. त्यातले विज्ञानही कळते. पूर्वीच्या काळी आपल्या शेतीप्रधान संस्कृतीत जास्तीत जास्त लोक खेडयात राहत. शेतात जात काम करत असतांना सर्पदंशाची भिती असते. यात अनेकजण मृत्यूमुखी पडायचे. विषारी सर्पाचा दंश झाला तर प्रथम माणसाची चव ओळखण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे विषारी सर्प चावला की बिनविषारी हे समजण्यासाठी अशा सर्पदंश झालेल्या माणसाला मिरची चावायला दिली जाई. यातील दुसरी वस्तू लिंबू, शेतक—यांला अंगमेहनत करावी लागायची सतत उन्हात काम करावे लागायचे एखादे वेळी नाकाचा घोणा फुटायचा अशा वेळी औषधी वनस्पतीबरोबर लिंबाचा रस दिला की बरे वाटायचे. असेही लिंबू पाणी प्यायले तरी प्रसन्न वाटते.

शेवटची वस्तू बिब्बा. ही एक दुर्लक्षित पण औषधी वनस्पती आहे. पोटात दुखत असले तर दहयात बिब्याचे तेल टाकून घेतले की पोटदुखी थांबते. अंगदुखीवर बिब्याचे तेल लावून मालिश केले तर बरे वाटते. पायात काटा रूतला की बिब्बा गरम करून त्या जागेवर चटका देतात अशा या बहुगुणी वस्तू चटकन सापडाव्यात म्हणून एकत्रित दारात बांधण्याची पध्दत होती. अमावस्या पौर्णिमेला हे बदलले जात असे. आजही ही दृष्टमाळ लावलेली दिसते. असे अनेक संकेत आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यांची सांगड घातली पाहिजे.

वैज्ञानिक दृष्टीकोन संत साहित्यातूनही दिसून येतो.

नवसे कन्या — पुत्र होती

मग का लागे पती?

असा प्रश्न तुकाराम महाराजांनी विचारला होता. संत गाडगेबाबांचे स्वच्छता अभियान ही एक वैज्ञानिक दृष्टीच होती. साहित्यातून या वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अधिक उत्कर्ष व्हावा म्हणजे समाज, आपला भारत देश साने गुरूजीच्या शब्दात —

''बलसागर भारत होवो
विश्वात शोभूनी राहो''

असा झाल्याशिवाय राहणार नाही.

***संदर्भ सूची —***

1.यक्षांची देणगी — जयंत नारळीकर मौज प्रकाशनगृह, मुंबई पाचवी आवृत्ती 2001
2.मराठी विज्ञान परिषद पत्रिका जानेवारी 2012
3.साहित्य शोधणी — डॉ. उषा देशमख नीहारा प्रकाशन पुणे — 2 प्रथमावृत्ती मार्च 1989